# भूमिका

## सानिया

वसू तयारी करुन निघताना माई म्हणाल्या, ‘ नऊ वाजुन गेले ना ग? ही बया अजुन नाही आली.’

वसू तंद्रीतच होती. अंदाजाने तिने विचारले, ‘ कोण?’

‘आपली बाई ग. तू निघण्याच्या आधी आली की बर असतं.’

वसू म्हणाली, ‘येईल. रोज तर येते साडेनऊपर्य ंत. आणि दार पुढेच आहे. तुला उठायला पण नको... मी निघते.’

आपण रस्त्याला लागेपर्यंत माई व्हरांडयातुन पहात असणार हे वसू जाणुन होती. वळताना तिने हात केला आणि बसस्टॉप गाठला.

सोमवारची सकाळ. वसूला उत्साहाची. नवा दिवस, नवा आठवडा. वेळ कसा सरसरत जात असे. तिसऱ्या मजल्यावर ती कामासाठी आली असता नेहमीप्रमाणे श्रीरंगला भेटली.

‘कसा आहेस?’ तिचा प्रश्न. तो चटकन म्हणाला, ‘तुला काही सांगायाचे आहे वसू.’

‘सांग’ ती म्हणाली.

‘तस नव्हे...लंच अवरला भेटुया. इथेच ये.’

तिला मनाशी नवल वाटलं पण ती अर्थात हो म्हणाली. थोडयावेळाने ती विसरल्यासारखी झाली. इमारतीचे प्रशस्त पाच मजले. खालच्या मजल्यावरती कॅन्टीन. पण आतले रुंद जिने असे की जाता येता गोलाकार सज्ज्यातील अनेकजण सहज दिसावीत. तशी ती जेवायला उतरत असताना तिला श्रीरंग त्याच्या टेबलापलिकडे दिसला आणि आठवण झाली.

बरोबरच्या मैत्रिणीला पुढे जायला सांगून ती वळली. त्याच्यासमोर आली. तो एकाग्रपणे काम करत होता.

ती बसत म्हणाली, ‘काय सांगणार होतास? बायकोशी पटेनास झालं आहे?’

पण श्रीरंग गंभीरपणे म्हणाला, ‘अजुन कोणालाच बोललो नाही वसू. म्हणजे तसं ऑकवर्ड वाटतं आहे, पण सुषमाला दिवस गेले आहेत.’ त्याने हे सांगताना आजुबाजुला पाहिलं, चोरटयासारखं. बहुतेकजण जेवायला गेले होते. दिवेही काढलेले होते.

वसू आश्चर्याने पहात राहिली.

‘मग? बायकोलाच ना. तु एखादया प्रेयसीला गरोदर केल्यासारखे सांगतो आहेस... अभिनंदन !’

‘प्लीज वसू... काय करायचे आहे ते समजत नाही आहे. आमचा निखील आता बारा वर्षाचा होईल. त्यावेळी सुषमाची इच्छा असुन असे काही घडले नाही. आता हे असे अचानक, बेसावध...’श्रीरंगने दीर्घ श्वास घेत गळयाभोवतीचा टाय सैल केला, ‘चाळीशीला आलेला माणुस आहे मी. या वयात पुन्हा बाप बनु?’

वसूला अजुनही मौजच वाटत होती. ‘इतका गोंधळुन काय जातोस? सुषमा काय म्हणते?’

'तिलाही काय कराव ते कळत नाही. हे अस काही असेलशी कल्पनाच नसल्याने कळेकळेपर्य त चार महिने होऊन गेले आहेत. तेंव्हा काही करायचे म्हणले तरी...रिस्कआहे.'
मग वसू म्हणाली, 'खरं सांग श्रीरंग...तुला खरं आतुन काय वाटते आहे?'
तो आधी स्तब्ध झाला. मग म्हणाला,
'कुठेतरी आनंदच होतो आहे.'
'मग झाले तर...लोकांना उशीरा मुले होत नाहीत का? आश्चर्य वाटल तर वाटु देत... काय म्हणतील फार तर?... आणि एन्जॉय इट.'
श्रीरंगने तिच्याकडे कृतज्ञापूर्वक पाहिलं. 'खरंच म्हणतेस?'
'मग? एजन्सीतला तु चढता तारा. कदाचित येणारं पोर अधिक काही चांगल घेऊन येईल ... मुलगा का मुलगी?'
श्रीरंग आता मनापासुन हसला.
'तेवढा विचारच केला नाही. कळल्यापासुन भांबावुनच गेलो होतो... माझ्यापेक्षा सुषमा जास्त...तिला भेटायला ये...तुझ्यावर फार विश्वास तिचा '
'येइन की. म्हणूनच मला आधी बातमी दिलीस नं?'
तो नुसताच हसला. वसू उठत म्हणाली, 'बाप बनण्यात तुझं पोट भरणार असलं तरी माझं नाही. मी जाते जेवायला.'
ती जाता जाता श्रीरंग म्हणाला, 'थॅंक्स वसू. आणि घरी यायला विसरु नकोस.'
तिने होकारार्थी मान हलवली.

कष्टानेच हालचाल करीत. फार चालतही नसत.
वसू त्यांना म्हणाली, 'सुषमा पुन्हा आई बनतेय.'
'कोण सुषमा?'
'श्रीरंगची बायको. आठवत नाही?'
'हं...' माई एकदम विचारमग्न झाल्या. मनात त्या स्पष्ट रेखाटण करत असाव्यात.
'पण त्यांना तर मोठा मुलगा आहे नं'
'तीच तर गंमत आहे. अचानक झाले. त्यांचीही अपेक्षा नव्हती. आता दोघांना लाज वाटते आहे बहुतेक.'
माई म्हणाल्या, 'तिचं वयही तसं मोठंच असेल. या वयात काळजीचंच. तुझ्याएवढी असेल ना ग?'
'असेल'वसूने तुटकपणे उत्तर दिले. माईच्या मनाची तिला कल्पना होती. त्यावरुन आता वसूला नवरा, संसार, मुले असती तर याकडे तिचे मन धावत असणार...
माईंचा सुस्कारा तिने ऐकला. मग ती म्हणाली, 'हे असेच का, तसेच का, असं का सारखा विचार करत असतेस?'
माई तिच्याकडे पाहु लागल्या. 'मी कुठे काय विचारलं? तुझी तु ठाम आहेस इतकी, अलीकडे कधी मी विषय तरी काढते का?'
वसूही काही बोलली नाही. नाहीतरी संसार आणि मुलबाळं यात रमण्याचा आपला पिंड नाही हे ती जाणून होती. पण माईला ते कसं समवजावता येणार? तिला ते कधी पटणारच नाही. तिच्या दृष्टीने आपलं आयुष्य अर्धवटच आणि एकसुरी. नीरस.

माईंनी आपली पोथी, पुस्तक आवरुन ठेवली. त्यांना सांधेदुखीचा एवढा त्रास होता की त्या

वसूला श्रीरंगच्या बंगल्यातल्या बाहेरच्या मोकळया व्हरांडयात बसलेल्या सुधाताईंची

आकृती लांबुनच दिसली. तिने गेट उघडले तेंव्हा आवाजाने त्यांची मान वर उचलली. त्या विणत होत्या.
'काय म्हणतेस वसू? बऱ्याच दिवसांनी आलीस.' त्या खुर्चीकडे निर्देश करत म्हणाल्या., 'बस, परस्पर आलीस?'
'आज शनिवार ना...'
'पण श्रीरंग नाही आलेला अजुन..
वसू रुमालाने कपाळ टिपत म्हणाली, 'आमची डिपार्टमेंटस आणि कामही वेगळी आहेत. त्याला सतत बाहेर जाव लागतं. तो मीडियात आहे मी कॉपी रायटिंगला...'
आतुन सुषमा सावकाश चालत आली. वसू तिला पाहुन चरकलीच. कदाचित पुष्कळ दिवसांनी अशा अवस्थेत पाहिल्यामुळे असेल असं तिने ठरवलं. सुषमाचा चेहरा क्लांत, ओढलेला दिसत होता.
सुधाताई म्हणाल्या, 'झाली झोप?'
ती नुसतं हं म्हणून बसली. त्या उठल्या, म्हणाल्या, 'मी चहा करते सगळयांना.'
सुषमा म्हणाली, 'मला नको.'
'का ग? घे ना...तरतरी वाटेल. थोडाच आणते.' मग त्या आत गेल्या.
सुषमा नुसतीच बसुन राहिली. वसूने आपली खुर्ची तिच्या जवळ ओढली. तिचा हात उचलुन हातात घेतला.
'ठीक आहेस ना सुषमा?'
'कशी दिसते?' तिने उलट विचारले.
'अं...थोडी थकलेली वाटतेस. पण तस होणारच ना.'
सुषमाचा तिच्या हाततला हात कोरडा, र्निजीव होता. ती म्हणाली, 'डॉक्टरकडे जातेस ना नियमित?'
'वसू, मला हे अजिबात नको आहे ग.'
वसू स्तंभित झाली. मग हसण्याचा प्रयत्न करत म्हणाली, 'एक्दम काहीतरी काय बोलतेस सुषमा? सातवा संपायला आाला आता आणि आता नको काय? तुला काही होतं आहे का? काही तक्रार?'
तिने मान हलवली. 'बस्स...फक्त नकोसं वाटत आहे. एक्दम हे ओझं, शरीराचा बेढबपणा....सगळं फेकुन द्यावासा वाटतो आहे.'
'का पण?'
'का म्हणजे? वसू मी असली कधी अपेक्षाच केली नव्हती. निखिल इतका मोठा झालेला, सगळं सुखासमाधानात छान चाललं होतं आणि अचानक...अचानकसुध्दा नाही. श्रीरंगनं मुद्‌दामच केलं हे असं...'
'मुद्‌दाम?'
सुषमाने मान वळवली. तिच्या डोळयातुन पाणी वहात होतं. वसूने तिचा हात थोपटला.
'कधी कधी अशी उदासी येते, पण ती निघुन जाते. काळजी कशाला करतेस? एकदा का बाळंतपण पार पाडलं की कशाचं काही वाटणार नाही. तुमच्या घरी एवढी सगळी आहेत कौतुक करायला. श्रीरंगचे आईवडील...स्वतः श्रीरंग. मला तर तो छान आनंदात दिसतो.'
'नसेल तर काय? त्याला थोडचं जायला लागतं यातुन? तु सांग वसू... हे बरोबर आहे का? या टप्प्यावर या वयात माझ्यावर हे सगळं लादणं?'
वसूला समजेना.
'वेडी की काय तु सुषमा? लादायचं काय म्हणतेस? अनपेक्षितरित्या झालं हे खरं आणि डॉक्टरांनींच सल्ला दिला ना की भलतं करु नका म्हणुन? आणि दुसरं तर मुलं आहे.

तुमच्याकडे सगळी सुबत्ता आहे. लाडात वाढेल. सगळं मिळेल त्याला किंवा तिला... तुला कसं वाटतं आहे?'
सुषमाने हात काढुन घेतला. डोळे टिपत ती म्हणाली, 'कुणास ठाऊक, पण फार उदास वाटतं...अस्वस्थता येते. कुणाला सांगितल तर कळत पण नाही. श्रीरंग तर हसण्यावारी नेतो. बाकी कोणाला समजणार? सगळी आपली माझ्या या अवस्थेची मजा लुटताहेत. त्यांना वाटतं की केवळ उशीरा, या वयात म्हणुन आम्हाला याची लाज वाटते आहे, पण ते तसं नाही वसू...मला आतुन अगदी...फार नको वाटते, चीड येते.
सुधाताई चहा घेऊन आल्या. वसूला कप देत म्हणाल्या, 'तुझ्याकडे कसं काय चालले आहे?'
'ठीक आहे.'
'श्रीरंग तसा ऑफिसबद्दल बोलत नाही फारसा, पण तुझ्याबद्दलचं कौतुक सांगत असतो कधीकधी. फार नाव आहे म्हणत होता. '
वसू विनयाने हसली. सुषमा नजर दूरवर लावुन बसली होती. सुधाताई तिला म्हणाल्या, 'घे ना ग चहा.'
'नको आहे मला.' ती एकदम उठली, म्हणाली, 'मी पडते आत...'आणि निघुनच गेली.
वसूने पाहिलं, सुधाताई कौतुकाने तिच्याकडे पहात होत्या. त्या म्हणाल्या, 'हे बाळंतपण जरा उशीराच म्हणायला हवं, पण बरं झालं निखिल अगदी एकटाच होता हे काही मला पटत नव्हते.'
वसूने विचारले, 'प्रकृती ठीक आहे ना तिची ?'
'सुषमाची? हो तर...दर पंधरा दिवसाला चेकपला घेऊन जात असते हल्ली. सगळं ठीक आहे म्हणाली डॉक्टर...ती होईपर्यंत हिवाळा चालु होईल म्हणुन आधीच करायला घ्यावं.' स्वतःचे विणकाम उचलत त्या म्हणाल्या. 'किती दिवसांनी लहान स्वेटर करते आहे. रंगही छान मिळाला बघ...'
वसू कुठेतरी निराश झाली.

मनात ठरवुनही वसूला श्रीरंग दोन तीन दिवस ओळीने भेटला नाही. जाता येता त्याचे टेबल रिकामचं दिसलं. तो बाहेर जात असावा. मग दिसला तेंव्हा ती ऑफिसबाहेर पडत होती तेंव्हा तो बाहेरुन कठुन येऊन आत चालला होता.
त्याला हटकत ती म्हणाली, 'थांब रे जरा केव्हढया घाईत आहेस'
'आहे जरा. हल्ली उशीरच होतो मला घरी जायला पण.'
ती म्हणाली, 'जरा कॉफी वगैरे पाज.'
'कशाला?'
'कशाला म्हणजे? सहज.... तेवढीच दहा मिनिटंही देशील कॉफीबरोबर.'
ऑफिसचे कॅन्टीन बंद झाल्याने दोघं जवळच्यच साध्याशा कामचलाऊ हॉटेल मध्ये गेले.
वसू म्हणाली, 'सुषमा कशी आहे रे?'
'एकदम मजेत.'
'मजेत? खरं?'
'का? तु भेटुन आलीस ना तिला? मजेत नाही?'
वसू म्हणाली, 'मला तर काळजीत वाटली. घाबरल्यासारखी दिसते.'
श्रीरंग तिचे म्हणणे उडवत म्हणाला, 'काहीतरीच. तिचा स्वभावच आहे काळजी करण्याचा.' निखिलच्या वेळेस पण अशीच

होती.  उगीच घाबरायची.  तिला आठवत नाही ते पण मला आठवतं.
‘तरीपण…’
‘अग वसू, ती काही पहिली बाई आहे का जी बाळंत होणार आहे?  तिची डॉक्टरपण म्हणाली की तिशीच्या पुढे असल्यावर एखादीवर टेन्शन येतं म्हणुन…’
‘मग तु कसा काय मदत करतोस तिला?’
‘खर सांगु का…मी माझ्या टेन्शनमध्ये आहे. एकावेळी एकदम दोन महत्वाचे अकाउंटस् आले आहेत.  तुला माहितच आहे किती महत्वाचे आहे ते.  मला घरी जायला पण उशीरच होतो.  ती तर झोपलेलीच असते तेंव्हा.’  वसूने मान हलविली.
‘किती बेजबाबदार!’
श्रीरंग एकदम चिडल्यासारखा झाला.
‘मग मी काय कराव अशी तुझी अपेक्षा आहे? तिच्या उशाशी बसुन  राहु?  डोन्ट बी सिली वसू…तिने माझ्याकडे तरफदारी करायला सांगितली तुला?’
वसू म्हणाली, ‘अजिबात नाही.  मलाच असं वाटलं कुठेतरी.  तुला सांगु का श्रीरंग…मी स्वतः या प्रोसेसमधुन गेले नाही;  पण मला असं वाटत की गरोदर असताना बाईला कुठेतरी करुन सावरुन नामानिराळा, ठीकठाक राहणाऱ्या पुरषाचा राग येत असतो.  स्वतःच्या स्थितीबद्दलही एक प्रकारचा हतशपणा वाटतो…म्हणुन म्हणाले की तुम्ही दोघांनी एन्जॉय करायला पाहिजे होतंत.’
श्रीरंग आतुन चिडला होता, पण वरुन स्वतःला शांत ठेवत म्हणाला, ‘उपदेशाबद्दल थँक्स…’
‘जा तुझा तु.’  वसू म्हणाली.

वसू साडी नेसताना माईला म्हणाली, ‘आज मी कदाचित परस्पर दवाखान्यात जाईन हं. श्रीरंगची मुलगी पहायला.’
‘मुलगी झाली त्याला?’
‘अस काय माई… काल बोलले नाही का मी तुला?’
माई नाराज होत म्हणाल्या, ‘कुठे बोललीस? अलीकडे धड लक्षसुध्दा नसतं तुझं.  काय बोलतेस…कसला विचार कारतेस?’
वसूला तरीही वाटत राहिले की आपण सांगितली ती बातमी कालच.  माई म्हणाल्या, ‘मुलगी होय?  किती पौंडाची?’
‘ते नाही मी विचारले.  श्रीरंगलाच फोन आला तर तो लगेच गेला ऑफिसमधुन…जाते मी.’
माईचे हरवलेले गढुळ डोळे तिला दिसले.  वाईट वाटले.  आपल्याबद्दल अशी बातमी ऐकायला ते मन किती उत्सुक असेल हे तिला जाणवल होतं पण तिने दुर्लक्ष केले.  या सगळया गोतावळयाची आपल्याला आवड नाही  हे माईला सांगुन कळणार आहे थोडंच?  तिला वाटत असणार हे सगळं आपल्याला चुकवुनच गेलं. तिच्या दृष्टीने मातृत्व वगैरे अगदी नैसर्गि करीत्या आवडायलाच हवं.  यात गैर काय?
दुपारी तिला बाहेर जायला लागले.  ती परतली तेंव्हा साडेचार वाजले होते.  तिच्यासाठी श्रीरंगचा फोन आल्याचा निरोप आला होता.  ती त्याला फोन करण्याआधी श्रीरंगचा सहकारी तिला म्हणाला, ‘तुला कळलं का वसू, श्रीरंगची मिसेस गेली.’
‘गेली म्हणजे? ’ तिला अर्थच लागला नाही.
‘गेली…वारली.  नुकती डिलिव्हरी झाली होती ना, काहीतरी गडबड झाली बहुतेक.  भेटायला

जायला हव ना.’

वसूच्या आतुन एक क्रुर थंड लाट कापल्यासारखी फिरत गेली. काही क्षण चक्करल्याप्रमाणे वाटले. तिला काही सुचेचना. सुषमा गेली असावी हे खरच वाटेना.

तिचा सहकारी सहानुभूतीने तिच्या खांदयावर थोपटत म्हणाला, ‘जरा धीरानं घे. जायचं ठरलं तर सांग. मिळुनच जाऊ.’

वसूने पाण्याचा ग्लास रिकामा केला. हे अस कस व का झालं ते तिला समजेना. सुषमाला कुठेतरी उदासी, भीती वाटत होती ते याचं कारण असु शकेल का? तिला मृत्युची चाहुल तर लागली नव्हती? आणि ती नुकतीच जन्मलेली मुलगी? ती ठीक आहे? आणि असेल तर तिचे कसे होणार? आणि श्रीरंग? काहीही झालं तरी त्याचे प्रेम होते सुषमावर. तिच्यासारखी साधी प्रेमळ मुलगी...अकरा बाराचा तो निखिल. त्याला मृत्युचा अर्थ तरी समजतो का?

वसू सुन्न, रिकामी झाली. संध्याकाळी दोघं चौघं मिळुन भेटायला जायचे ठरले. एकदा वाटले की माईला कळवावे. मग लक्षात आलं की उशीर झाला तरा तिची कल्पना होईल की दवाखान्यात भेटायला गेली आहे. त्या सगळया विचारांच्या गुंत्यात वसू इतकी बधीर झाली की तिच्या उशीराच लक्षात आलं. आपल्याला चारचौघांसारख रडुही आलं नाही.

गेट उघडताना वसूला तो शांत बंगला दिसला. व्हरांडयात कोणीच नव्हते. सुधाताई बाहेर आल्या. वसू आत आली. तिथल्याच खुर्चीत बसली.

त्या म्हणाल्या, ‘आज या वेळेला कशी?’ त्याही बसल्या.

‘आज शनिवार नाही का?’

‘खरंच की! लक्षात नाही बघ...श्रीरंगही रजेवर आहे ना?’

‘निखिल जायला लागला शाळेत?’

‘कधीच...’ त्या सुस्कारा टाकत म्हणाल्या. ‘बाकी काही थांबुन राहतं थोडचं? आणि त्याला लगेच पाठवला आम्ही. घरात राहुन भेदरला होता फार. तिकडे मित्रात रमेल म्हणुन...’

मग आतुन बाळ रडण्याचा आवाज आला. सुधाताई म्हणाल्या, ‘बघता बघता महिन्याची पण झाली. दृष्ट लागेल असे रुप आहे बघ.’ मग त्यांनी हाक मारली. सांभाळायला ठेवलेली बाई दुपट्यात बाळाला घेऊन आली. तिने ते सहजपणे वसूच्या पुढ्यात धरले. वसूने तिला काळजीपूर्वक हातात घेतलं. तिच्या लहान चेहऱ्याकडे बघितले.

‘कुणासारखी वाटते?’ सुधाताईंनी उत्सुकतेने विचारले.

वसू गोंधळली, ‘काही समजत नाही.’

‘आम्हाला तर श्रीरंगचाच छाप वाटतो. मुलींनी बापाचा तोंडवळा घेऊन जन्माला यायचे असतं.’

वसूला काही समजत नाही. हातातल्या गाठोडयाचे काय करावं तेही कळेना. मग बाईंनी तिला परत घेतले.

सुधाताई म्हणाल्या, ‘रडली ना मघा? दुधाची वेळ झाली असणार. चल करुन देते...श्रीरंगला पाठवुन देते बाहेर.’

वसू थोडावेळ एकटीच तिथे होती. सुषमाशी तिथे बसुन केलेल्या गप्पा तिला आठवल्या. ती श्रीरंगची पत्नी होती म्हणुन केवळ तशी तिच्याशी मैत्री होती. पण कोणालाही आवडावी, निदान

नावडु नये असा तिचा स्वभाव होता. साधा, सरळ, प्रेमळ, घर संसाराची आवड असणारा, सर्वांना मदत करण्याचा. कित्येक्दा ती दोघं निखिलसह बाहेर जाताना, सिनेमाला, जेवायला, पिकनिकला वसूला आग्रहाने बोलवत. सगळी एकत्र जमली की त्या दोघी मिळुन श्रीरंगची हमखास चेष्टा करत. सुषमाला वसूचा इतका विश्वास आणि आधार वाटायला लागला की एखाद्या भांडणानंतर ती वसूजवळ आपले मन उघडं करीत असे. श्रीरंगच्या तक्रारी सहजपणे सांगुन जाई. वसूने ते सगळं गृहीत धरल होतं. मैत्री समजून.

पण ते असुनही दोघी तशा भिन्न होत्या. वसूच्या हुशारीचा, करिअरचा सुषमा कित्येकदा उघडपणे हेवा करत असे. वसूला तिच्या सांसारिक प्रेमाचा हेवा जरी वाटला नाही तरी कुतुहल होते. सुषमाची माया तिने स्वतःच्या मैत्रीने कायम परत आणली.

श्रीरंग बाहेर आला. सुधाताईंनी चहा व खायला पाठवलं.

वसूने विचारलं, ‘तु कधी कामाला येणार आहेस?’

‘काही ठरवल नाही.’

‘इतके दिवस रजा...काय करतोस तरी काय?’

‘काहीच नाही. घरीच असतो.’

वसूने त्याच्याकडे पाहिलं. त्याचा चेहेरा ओढलेला, हरवल्यासारखा दिसत होता. तिला त्याची दया आली.

ती म्हणाली, ‘तु लवकर कामाला लागावंस...’

‘सगळी तेच म्हणतात.’

‘मग?’ तिने विचारलं, ‘तु का अडुन राहिला आहेस?’

श्रीरंग एकदम उठत म्हणाला, ‘आपण थोडं फिरायला जाऊया का वसू? मी जरा आईला सांगुन येतो.’

ती हो म्हणाली. जवळ आलेल्या हिवाळयामुळे हवेत गारवा भरु लागला होता. घर मागे पडल्यावर श्रीरंग म्हणाला, ‘आपण इतके प्रश्न विचारतो स्वतःला पण काही उत्तरच मिळत नाही बघ.’

ती किंचित हसली.

तो म्हणाला, ‘हे असं व्हावंच का मुळात? आजच्या या काळात बाळंतपणासारख्या गोष्टीत बायकांना आपले जीव गमवावे लागतात?’

‘तसं नव्हे रे. एरवी ते सगळं अगदी सोपं असतं. बाळंतपण. तरी कधी काही अनपेक्षीत गुंतागुंती होऊ शकतात. सुषमाच तसंच झालंना? कोणालाही कल्पनाही नव्हती.’

‘बघता बघता ती कोमात गेली. डॉक्टरला सुध्दा कळेना काय झाले ते. कळलं तोपर्यंत उशीर झाला...आणि इतक होऊन जन्माला आलेली ती मुलगी...’

‘नाव काय ठेवलतं?’

‘अजुन काहीच नाही.’ श्रीरंग म्हणाला, ‘अजुन तिला हाक मारायची वेळ येत नं. येईल तेंव्हा बघू.’

‘निखिलने कसं घेतलं आहे?’

‘गप्प बसतो बिचारा. त्याला फार जाणवलं असेल. असेलच...मला तर असं वाटत की ... नशिबाने मला सापळयात पकडलं आहे घट्ट.’

‘श्रीरंग...’

‘नाहीतर काय...या वयात या वेळी. मुळात मी बाप व्हाव. त्यात माझी बायको जावी....माझ्या करिअरची अशी धूळधाण...आता मी हे सर्व निस्तरुन न्यायचं...दोन मुलांना वाढवायचं...

तिला तर पहिल्यापासुन एकटयानं....'
वसूने वळुन आश्चर्याने त्याच्याकडे पाहिलं, 'या सगळया गोष्टी तुझ्या हातातल्या थोडीच होत्या? त्या घडल्या...तु त्यातुन सावरायला हवंस.'
'कसं?' त्याने कडवटपणे विचारले.
वसूला उत्तर सुचलं नाही. कसं ते आपलं आपणच पहायला हवं. कुणाची मदत लागण्याइतका दुबळा आहेस का तु? असे शब्द ओठावर आलेले तिने मागे घेतले. तिला वाटलं आताशी महिनाच होतो आहे. हे सर्व स्वीकारणं सोपं नाही. वेळ लागेल क्दाचित.

हिवाळा वाढला तसा माईंचा त्रासही वाढला. त्यांना औषधपाणी, डॉक्टरकडे नेणे ही त्या मोसमातली जास्तीची कामं वसू करु लागली. एकदा ऑफ्सिातुन परतताना मध्येच उतरुन ती केमिस्टच्या दुकानात शिरली. तिथे सुधाताई भेटल्या. दुधाचे डबे, कापुस अशा गोष्टी हातातील यादी वाचत त्या खरेदी करत होत्या.
वसूला म्हणाल्या, 'एवढं काय लागतं ग अलीकडे. सांभाळायला ठेवली आहे बाई पण आईपण माझंच आहे.'
'कशी आहे? मोठी होत असेल...'
'तर ग. रांगायला पहाते आता.'
'नाव नाहीच ठेवलतं अजुन?'
'हे राहुनच गेलं बघ. सगळीजण बाळ, बेबी असंच म्हणतात. एकदा वाटतं लहानसं घरगुती बारसं करावं.'
'त्याची काय गरज आहे? काहीतरी म्हणायला लागा...' वसू म्हणाली. 'सुषमाचे आई वडील काय म्हणतात?'
सुधाताई दीर्घ श्वास टाकत म्हणाल्या, 'ते काय नुसते येऊन भेटुन गेले. आमच्यापेक्षा त्यांची वयं झालेली...मुलगी आमचीच ना.'
वसू थोडावेळ पहात राहिली. त्यांनी सामान गोळा केलं. पैसे दिले. मग बरोबर बाहेर पडताना म्हणाल्या, 'श्रीरंग ठीक असतोना ग ऑफिसमध्ये?'
'असतो की. का...काय झालं?'
'तसं नव्हे. पण घरी फारसा काही बोलतचं नाही बघ.'
वसू सावरुन घ्यायला म्हणाली, 'त्याच्याकडे कामं आहेत बरीच. मधे रजेवर होताना बरेच दिवस...तिथे कोणी मागे पडला की थांबलाच. स्पर्धा असते फार.'
'हो...' सुधाताई म्हणाल्या. कामावर जायला लागला ते बरं. नाहीतर सतत तेच डोक्यात.
सुधाताईंनी रिक्शा केली. वाटेत कुठे सोडते म्हणुन वसूला घेतलं. माईंची चौकशी केली. त्यांच्या भेटी क्वचितच झाल्या होत्या.
'येत जा ग वसू कधीतरी...बाळाला पहायला तरी ये. '
'येईन' वसू उतरताना हसत म्हणाली, 'तुम्ही तिचे नामकरण करुनच टाका...निखिलला साजेसं काहीतरी ठेवायचं.'
'काय? सुचव तुच...'
वसू चटकन फारसा विचार न करता म्हणाली, 'नी पासुन घ्यायचे. नीति कसं आहे?'
सुधाताई म्हणाल्या, 'छान आहे ग...नीतिच म्हणुया आपण. आता तुला जेवायलाच घरी आलं पाहिजे. बारशाचे जेवण समज.'
वसू हसली आणि हो म्हणाली.

लंच अवरमध्ये वसूला श्रीरंग भेटला. तो आता

पुर्वीसारखा बिझी दिसत होता.
‘काय बातम्या?’ तिने नेहमीसारखे विचारले.
‘चालु आहे सगळं’ तो उत्तरला, ‘आता निखिलची परिक्षा जवळ येत आहे. आईने मला त्याचा अभ्यास घेणे भाग पाडले आहे.’
‘काही वाईट नाही.’
तो हसुन म्हणाला, ‘कुणाचेच उपदेश कधी वाईट नसतात नाही?’
न समजुन तिने विचारले, ‘कुणाचे?’
‘आईतर म्हणायला लागली आहे...’ मग आजुबाजुला कुणाला ऐकु जाऊ नये म्हणुन आवाज खाली आणुन तो म्हणाला, ‘दुसरं लग्न कर म्हणुन...’
वसूने त्याच्याकडे पाहिले, ‘खरं? एवढयात ?’
‘एवढयात म्हणजे?’
‘म्हणजे असं की...?’ वसू जराशी अडखळली. हा सगळा व्यवहार तर आहे, तिच्या मनात आलं. एक बायको गेली की दुसरी करायची. घर चालवायला, मुलाला पाहायला, अभ्यास घ्यायला, मुलगी वाढवायला, आणि श्रीरंग अजुन तरुण असेल, ऐन वयातला म्हणुनही. म्हणजे मग सुषमा नावाच्या स्त्रीच्या स्थानाला विशेष अर्थ नाही. पण नाही कसा?
श्रीरंग म्हणाला, ‘मलाही सुरवातीला ते चमत्कारीक वाटलं पण रोजच्या आयुष्यात... तुला ठाऊक आहेत ठराविक मुद्दे. घरी एक बायको का लागते ते...मुख्यतः निखिलसाठी. तो फार अबोल, घुमा झाला आहे. आम्हा सगळयांचं प्रेम पुरत नसावं...तो लगेच नवी आई स्वीकारेल अस नव्हे, पण निदान कुणी प्रेमाने बघणारी...आणि नीति...तिला तर नक्कीच आई हवी. ’
वसू नकळत म्हणाली, ‘तु हे सर्व स्वतः पटवुन घेऊन बोलतो आहेस ना श्रीरंग?’
तो चपापुन गप्प बसला. कुणी दुसरे सहकारी आले आणि तो विषय बाजुला गेला.
सुधाताईंनी पुन्हा एकदा निरोप पाठवुन वसूला बोलावून घेतलं. रविवारी जेवण झाल्यावर सगळी मिळुन श्रीरंगच्या एका जवळच्या राहणाऱ्या काकाकडे गेली. त्यांच्याकडे कुणी परदेशाहुन आले होते आणि म्हणुन एकत्र गाठीभेटी होत्या. तिथुन नंतर श्रीरंग तिला घेऊन पाय मोकळे करायला म्हणुन बाहेर पडला. थोडावेळ गेल्यावर तो म्हणाला, ‘तुला एक विचारायचं आहे वसू.’
तिने नुसते प्रश्नार्थक पाहिलं
‘माझ्याशी लग्न करायला आवडेल तुला?’
श्रीरंगचा तो प्रश्न ऐकुन वसू काही क्षण स्तिमित होऊन पाहातच राहिली.
‘काय विचारतो आहेस रे?’
‘का? मी एवढा वाईट आहे?...तु तर मला चांगली ओळखतेस.’
‘ओळखत असेन. पण श्रीरंग आपण एकमेकांच्या प्रेमात नाही.’
तो हसला. ‘प्रेमात काय नंतरही पडता येतं. तो मुद्दा नाही.’
तीव्रपणे तिने विचारलं, ‘मग काय आहे? आपली चांगली मैत्री आहे. तुला आठवतं... जवळजवळ कॉलेजपासुन आपली ओळख आहे. आपण एकाच लाइनीमध्ये शिरलो... एक दोन एजन्सी बदलत नशीबाने एकाच ऑफिसमध्ये आहोत... इतके दिवस आपली छान, विश्वासाची, जवळची म्हणतात तशी मैत्री आहे. सुषमा असेपर्यंत ती सुध्दा सहाजपणे या मैत्रीचा भाग होती... यात कधी दुसऱ्या भावनांची गल्लत झाली नाही. सुषमा असताना तर नाहीच नाही.

पण आता ती नाही म्हणुनही नाही...आपल्या ऑफिसमधले चार कुचाळके लोक काहीबाही आपल्याबद्दल म्हणत असतानाही त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन आपण छानपैकी आपली मैत्री जोपासली... आणि तु आता हे काय म्हणतो आहेस?'

तिच्या या आवेशामुळे श्रीरंग आधी गडबडलाच. मग म्हणाला, 'अशी एकदम बरसु नकोस... विचार कर आणि सांग. कसली घाई आहे असंही नव्हे... पण हा विचार जितका तु समजतेस तितका विचित्र नाही... आपण काय ठराविकच नाती जोपासायला हवीत असं आहे का?' आणि आधी मैत्रीपासुन सुरुवात केल्यावर प्रेम आणि लग्न मुळीच अवघड नाही.

वसू काहीशी संभ्रमित अवस्थेत, स्वतः आतला उसळणारा राग आवरत चालत राहिली. तिच्या लक्षात आलं की आता आपण काही म्हटलं तरी श्रीरंग ते तसंच आवेशातलं म्हणुनच घेणार. त्यापेक्षा थंड डोक्याने, आठ दिवसांनी त्याला उत्तर देऊ. तोपर्यंत तोही ठिकाणावर आला असेल.

टॉवेलने ओले केस पुसता पुसता वसूनं ठरवलं की माईपासुन आपण कधी काही लपवुन ठेवलेलं नाही, तेंव्हा हे देखील सांगायला हवं.

ती म्हणाली, 'श्रीरंगने मला लग्न करतेस का म्हणुन विचारले आहे माई.'

माई पाहात राहिल्या. त्यांच्या चेहेऱ्यावर आश्चर्य , कुतूहल, आनंद एकापाठोपाठ एक उमटुन आला.

'कधी ग? तरीच...'

'मागच्या रविवारी... तरीच काय?'

'सारखी जात असतेस त्याच्या घरी.'

'माई...' ती ठाम पण सौम्य स्वरात म्हणाली, 'मी हो म्हणालेली नाही.'

'का नाही?...अग, आयतं चालुन आलं आहे. आता नसतं काही काढु नकोस. इतका चांगला मुलगा... घर आहे... आई वडील आहेत... आता तुझही तर वय झाल आहे. असतील त्याला दोन मुलं तर काय झालं...इतक्या माहितीतला आहे. तुला काहीपण जड जाणार नाही.' माईचा स्वर कमालीचा उतावळा झाला.

वसू शांतपणे केस पुसत राहिली. 'तुझ्याशी बोलते आहे ग मी...हो सांग त्याला. आता माझी काळजी करु नकोस. मी राहीन अशीच माझी मी. बाई ठेव. बघुन जात जा. नाहीतर एखादा आश्रम पाहुया...हल्ली असतात चांगले असे आश्रम एकटया बायकांसाठी. इतके दिवस आई आई करत लग्नाचा विचार नाही केलास. आता अशी संधी...'

वसू स्तब्ध झाली. संधी...किती बरोबर आहे हा शब्द. सगळयांना ती संधीच तेवढी दिसते आहे. आपल्या भोवतालचा समाज, माई, श्रीरंग...सगळं कसं बरोबर बसत आहे. कोडयाच्या खेळासारखं...एक रिकामी जागा आणि तिथे एक आयती, तयार वस्तु. त्या आकारात बरोब्बर बसेल असं सगळयांना वाटायला लावणारी. फक्त त्या रिकाम्या जागेतल्या पहिल्या आणि आताच्या तुकडयांचा पोत, रंग, गुणधर्म, त्यांचे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्वच...याचा मात्र विचार नाही.

वसू शांतपणे खांदयावर टॉवेल टाकत म्हणाली, 'तुला मी फक्त त्यानं विचारलं हे कानावर घातलं. मी काही निर्णय नाही घेतलेला.'

वसू सलगपणे कामात व्यग्र होती. पुर्वी तरीही ती माईसाठी लवकर घरी जात असे. पण अलिकडे उशीर होऊ लागला होता.
त्या संध्याकाळी ती आल्याआल्या माई म्हणाल्या, ‘उशीर केलास ग यायला. सुधाताई तुझी वाट पाहात होत्या.’
‘सुधाताई? आल्या होत्या?’
‘मला भेटायलाच आले म्हणाल्या, पण वाट पाहिली तुझी.’
वसू आत गेली. म्हणाली, ‘माझी कामं वाढली आहेत आता. मला वरची ग्रेडपण मिळाली. ठाऊक आहेना तुला? जास्त कामं असतात...’
माई तिच्यापाठोपाठ आल्या.
‘त्यांनी मागणी घातली आहे तुला.’
चेहेऱ्यावर पाणी मारता मारताही वसूला हसु कोसळलं. ही कसली फुशारकी?
‘मी त्यांना म्हणालेही की मला तर सगळं पसंत आहे. त्यांनाही तु फार आवडतेस. निखिललाही तुझी ओढ आहे म्हणत होत्या. आणि नीति नाव तूच सुचवलस म्हणे? मला बोलली नाहीस. कसंही असो. असे योग जुळुन येत नाहीत सहजासहजी.’
वसू म्हणाली, ‘बसुया का ग जेवायलाच?’
‘बसु गं...आधी मला सांग...’
वसू थबकली. ‘माझ्यावर असे प्रेशर आणु नका. माई...त्यांना एक सुन, मुलांना आई अशी हवी आहे. मी त्यात बसत नाही हे माहित आहे ना तुला तरी?’
‘काय बसायचं त्यात? संसार हा आपोआप होतो. तुला त्या मुलांबद्दल प्रेम नाही वाटत? उलट तुझ्यासारखी ओळखीची मुलगी त्या मुलांचे किती मायने करेल.’
वसू आता खालीच बसली. ‘माझे करिअर आहे माई. इतकी वर्ष कष्ट घेऊन मी ते बांधत आणलं आहे. मला मनासारख मिळवायची, खर्च करायची सवय झाली आहे...मी हे सर्व सोडुन देऊ? आई व्हायचा माझा पिंड नाही.’
माई म्हणाल्या, ‘हे काय बोलण तुझं? कुठल्या बाईला आई व्हायला सहज जमतं...इतकी वर्ष विना लग्नाची राहिलीस. ते काय सोपं आहे. उदया मी मेल्यावर एकटीच राहशील? चार लोकांना तोंड देशील?...चांगला संसार चालुन आला आहे तुझ्यापाशी. नवरा, मुलं, घर, पैसा...तिकडे कशाला काही कमी नाही. सगळीजण प्रेम करतील तुझ्यावर. करिअर करिअर किती दिवस? म्हातारपणी माणसं लागतात सोबतीला...जरा माझा तरी विचार कर.’
वसू सुन्न बसुन राहिली. माईचं मन तिला स्पष्ट कळत होतं. तिच्याबद्दल करुणाही वाटत होती. पण स्वतःच्या मनाचा आवाज मोठा होता. तो डावलायची आत्तापर्यंत कधीच सवय नव्हती. तो हट्टी, ठाम आवाज ऐकत असतानाही तिला दोलनामय वाटत राहिलं.

श्रीरंग नेहमीसारखा अधुनमधुन ऑफिसमध्ये भेटत राहिला. कुठलाच प्रश्न न उद्भवल्याप्रमाणे दोघंही एकमेकांशी वागत राहिली. एक तर कामाची घाई खूप असे. त्यामुळे दोघही आपापल्या रिंगणात धावत राहिली.
अनेक दिवसांनी श्रीरंग तिला जिन्यावर भेटला तेंव्हा सहज म्हणाला, ‘अलीकडे घरी आलेली नाहीस. आईनं विचारणा केली आहे.’
वसू मोकळेपणाने म्हणाली, ‘भीतीच वाटते रे

घरी यायला.'
'का?' त्याने विचारले.
'का काय? तुला माहित आहे?'
श्रीरंगने चटकन आजुबाजुला अंदाज घेतला. कुणी जवळपास नाही हे पाहात म्हणाला, 'घाबरते आहेस गुंतुन घ्यायला. खरे की नाही?'
ती म्हणाली, 'कधीतरी बोलु त्यावर.'
'आज संध्याकाळी थांबतो तुझ्यासाठी. आटोपलं की ये.'
वसूला खात्री नव्हती तरी चालढकल करीत राहून मगच गेली. अजुनही काही लोक नेहमीप्रमाणे थांबले होतेच. श्रीरंग हातातलं काम पुरं करुन तिच्याबरोबर बाहेर पडताना म्हणाला, 'लोकांनी सोईस्कर अर्थ केंव्हाच लावलेत. '
ती म्हणाली, 'लोकांचं काय? तुम्ही सगळी सुध्दा सोईस्करपणेच वागता आहात.'
'म्हणजे काय?'
'उगीच वेड पांघरु नकोस श्रीरंग... मला अजुनही वाटतं की तुझी बायको व्हायला मी योग्य नव्हे. '
'पण वसू...'
'ऐकुन घे. माझ्या स्वतःच्या कामाची आवड असलेली, संसार, मुले, स्वयंपाक यात अजिबात रस नसलेली अशी मी स्वतंत्र, हेकट बाई आहे तु ऑफर करतोस तो रोल माझ्यासाठी नाही.'
श्रीरंग हताशपणे तिच्याकडे बघू लागला. दोघानी निरुद्‌देश रस्ता धरला होता. चालतच.
वसू मग थोडया मृदुपणे म्हणाली, 'केवळ मी उपलब्ध आहे म्हणूनच ना? मी माझी नोकरी सोडुन तुझ्या मुलांची आई बनुन येऊ?'
'पण मी नोकरी सोड असं म्हटलेलं आहे का?'
'मग तर ते अधिकच कठिण आहे. लग्नाच्या डगरीवर चालता चालता आदर्श सुन, आदर्श आई वगैरे मला बनता येण केवळ अशक्यच आहे...जरा धडपणे विचार कर. सुषमा माझ्याहुन निराळी होती. तुला त्याच भूमिकेतुन कुणी हवी आहे. पण तशीच कुणी अनोळखी, सामान्य बाई स्वीकारायला तुला भीती वाटते म्हणून तुम्ही सगळे जिला ओळखता अशा मला, त्या भूमिकेत अट्टाहासाने बसवायचा प्रयत्न करत आहात. त्या अंतरावरुन मी छान वाटते. सुधाताईंना, तुझ्या मुलांना...पण तशीच मी छान आहे. त्या चौकटीत तुम्ही मला बसवलीत तर माझी मी राहणार नाही. मग तुमचीही निराशा होईल आणि माझी तर होईलच होईल. '
श्रीरंग आता गंभीर चेहेऱ्याने रेंगाळत चालत राहिला. वसूला एकदम त्याची दया आली. सगळयांचीच आली. पण त्या दयेत तिच्या आतली स्थिरता तरीही अचलच राहिली.
तिने नकळत श्रीरंगचा दंड पकडला, 'धावू नकोस आता. रस्ता संपतो आहे पुढे.' ती दोघही चालता चालता बरचं अंतर काटुन आली होती. इथे तुरळक घरं होती. बरीचशी घरबांधणीची कामं चालली होती.
श्रीरंग थांबला. वळुन तिच्याकडे पाहात म्हणाला, 'ते सगळं आपण नंतर विचारात घेऊ. मला आधी सांग...माझ्याशी केवळ माझ्याशी म्हणुन लग्न करावसं नाही वाटत तुला?'
वसू हसली. थोडावेळ त्याच्या चेहेऱ्याकडे पाहात राहिली.
'काय उत्तर देऊ तुला? तो प्रश्न असा सुटा विचारताच येत नाही. माझा मलाच विचारता येत नाही...तुझं ठीक आहे. माझ्याशी लग्न करुन तुझ्या आयुष्यात काही फरक पडणार नाही. म्हणुन त्या सुखाची हाव वाटते तुला. पण माझं

सगळं आयुष्यचं बदलुन जाईल...मी करिअर चालु ठेवली तरी, सोडली तरी...कुठल्यातरी भूमिका रेडिमेड जीव ओतुन करायच्या, एवढीच माझी कसरत राहील. ते मला करायच नाही. मी लग्न न करायचा निर्णय केंव्हा घेतला माहित आहे? तरुण होते तेंव्हा एका प्रेमात आपटी खाल्ली, तिथे काही जुळलं नाही तेंव्हा माझं आयुष्य मी बनवायला सुरुवात केली. मग लक्षात आलं की यात खूप आनंद, अभिमान सर्व आहे. माझा पिंड बायको, आई, गृहिणी यातच समाधान मानायचा नाही. तु हे समजुन का घेत नाहीस श्रीरंग? आयष्याच्या, नात्याच्या या टप्प्यावर केवळ भावनिक निर्णय घेता येत नाहीत. ते व्यवहार्यही असावे लागतात.'

श्रीरंग विचारात तसाच उभा राहिला. वसुने विचारले, 'तुला मी मैत्रिण म्हणुन हवी आहे की नाही? मग तुम्ही सगळी मिळुन हे नातं माझ्यावर लादु नका...मी सुषमाहुन निराळी आहे. तिच्या जागी मी शिरले तर ते सततं मला जाणवत राहील.'

तरीही श्रीरंगचा हट्टी चेहेरा तिला दिसला. त्याला आपल्याकडुन काय उत्तर अपेक्षित आहे याची तिला एकदम जाणीव झाली. प्रत्यक्ष लग्न होईल न होईल, आपण त्याच्याबद्दलचा मोह शब्दात स्पष्ट करायला हवा आहे हे तिला उमजुन आले. म्हणजे तो त्याचा एक पुरुष, प्रियकर या नात्याने विजय ठरला असता. त्या क्षणी तिला वाईटही वाटलं आणि रागही आला. श्रीरंगसारख्या पुरुषाला जागं करणे किती कठिण असा विचार मनात येता येता ती कष्टी झाली.

वसू श्रीरंगच्या टेबलापाशी उभी राहिली तेंव्हा तो खाली मान घालुन लिहिण्यात मग्न होता. टेबलावर बोटानं टकटक करीत ती म्हणाली, 'एखादं मिनिट घेऊ का तुझं?'

त्यानं वर पाहिलं.

'एक आनंदाची बातमी आहे. मला आत्ता कळली, म्हटलं तुला आधी सांगावी. तु माझा सर्वात जवळचा मित्र ना!' वसू हे सगळं सहजपणे म्हणाली.

श्रीरंग हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, 'सांग.'

'मी दुसरीकडे जाते आहे. नवा जॉब. जास्त चॅलेंजिग अर्थात जास्त पगार.'

श्रीरंगचा चेहेरा पडला. तरी त्याने विचारले, 'इथेच ना?'

'इथेच. पण आता आपण एका ऑफिसमधले सहकारी नाही...स्पर्धक झालो.'

'अभिनंदन!'

ती हसली. 'महिन्याची नोटिस दयावी लागणार आहे. पण मी रजाही घेणार आहे. तेंव्हा...' मग थांबुन तिने जोडलं,

'कधी आठवण वगैरे झाली तर फोन कर, भेटायला ये. येशील ना?'

तो आता कष्टपुर्वक हसला.

'सुधाताईंना सांग. कधीतरी येऊन जाईन... माईला जरा बरंही नाही. ती फार चटकन मनाला लावुन घेते काहीकाही गोष्टी...म्हणुन तिलाही हवापालट म्हणुन कुठेतरी घेऊन जायचा विचार आहे...'

ऑफिसमध्ये दुपारची नेहमीची वर्दळ होती. फोन, बोलणी, हाका, येणारे जाणारे. वसू त्या गराडयात मोकळया आत्मविश्वासाने हात पुढे

करत म्हणाली, 'विश मी लक श्रीरंग'
प्रथमच तिची ओळख लखकन झाल्याप्रमाणे श्रीरंगनं तिच्याकडे पाहिलं आणि तिचा हात हातात घेऊन तिला शुभेच्छा दिल्या.

---

प्रिय वाचक,
मराठीतील दर्जेदार साहित्य आपल्यापर्यंत पोहोचवायचा आमचा हा प्रयत्न आहे. आपला अभिप्राय आम्हांस (marathikatha@gmail.com) व लेखिकेस (saniyadb@hotmail.com) जरुर कळवावा.

Copyright ©
सर्व हक्क लेखिकेकडे स्वाधीन. या कथेची soft copy आपण वापरु शकता. परंतु अन्य उपयोगासाठी लेखिकेची परवानगी आवश्यक आहे.